# ग्रामस्थ दिन योजना

## संकल्पना

ग्राम पातळीवरील प्रशासन हे आजच्या परिस्थितीत सर्वात महत्वाचे झाले आहे. शासनामार्फत ग्रामस्थांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविल्या जातात परंतु बऱ्याच योजनांचा लाभ प्रत्यक्ष ग्रामस्थांपर्यंत बऱ्याचवेळा पोहोचत नाही असे चित्र दिसते. गाव पातळीवर महसूल विभागाचा प्रतिनिधी तलाठी, ग्राम विकास विभागाचा प्रतिनिधी ग्रामसेवक तसेच शासनाच्या विविध खात्याचे ग्रामस्तरीय अधिकारी / कर्मचारी कार्यरत असतात.त्यांना ग्रामीण जीवनाची तसेच त्यासंबंधीच्या प्रश्नांची / समस्यांची / चांगली जाण असते. वर नमुद केल्याप्रमाणे शासनाच्या विविध कल्याणकारी योजना त्या त्या शासकीय प्रतिनिधीमार्फत सामान्यतल्या सामान्य घटकापर्यंत प्रभावीरित्या पोहचविण्यात येणाऱ्या अडचणी / समस्यांची सोडवणूक तिथल्या तिथे होवू शकते व तसेच ते होणे आवश्यकही आहे. परंतु तसे होतांना दिसत नाही. तसे न होण्याच्या अनेकविध कारणांपैकी वर नमुद केलेल्या विविध ग्रामपातळीवरील शासकीय / अधिकारी / कर्मचाऱ्यांमधील समन्वयाचा अभाव हे एक प्रमुख कारण दिसून येते.त्यामुळे त्यांचा परस्पर समन्वय घडून आणणे हे ग्रामस्तरावरील समस्या / अडचणी सोडविण्याचे दृष्टीकोनातून उचललेले महत्वाचे पाऊल ठरेल.

### ग्रामस्थांना येणाऱ्या अडचणी :

गावपातळीवरील ग्रामस्थांच्या प्रश्नात गावकऱ्यांना ७/१२ उतारा लवकर न मिळणे / जमीन विषयक नोंदी लवकर न होणे, ग्रामपातळीवरील अभिलेख जसे जन्म-मुत्यु दाखला, विविध अर्ज ग्रामस्थांना सहज उपलब्ध न होणे, गावातील स्वस्तधान्य दुकानात केरोसिन व धान्य न मिळणे किंवा ते शासकीय किंमतीत न मिळणे, शाळेत शिक्षकांची अनुपस्थिती, शालेय पोषण आहार / अंगणवाडी आहार न मिळणे, प्राथमिक आरोग्य केंद्र / उपकेंद्रांवर आरोग्य अधिकारी / कर्मचारी हजर नसणे / औषधे उपलब्ध नसणे, वीज चोरी होणे, कृषी विषयक माहिती ग्रामस्थांना न मिळणे, पिक पहाणी योग्य पध्दतीने न होणे, ग्रामस्तरावरील विविध योजनांची माहिती न मिळणे हे व अशा सारखे अनेक प्रश्न लाभार्थींना, ग्रामस्थांना भेडसावत असतात. त्यामुळे गांव स्तरावरील विविध कल्याणकारी योजनांचा लाभ व त्याबाबतची माहिती ग्रामस्थांपर्यंत पोहोचते किंवा कसे हे गाव पातळीवरीच पाहून त्याचा नियमितपणे आढावा घेणे अत्यावश्यक आहे.

## ग्रामस्थ दिन कशासाठी ? :

लोकांपर्यंत जाण्यामध्ये शासकीय यंत्रणा कुठेतरी कमी पडते व यातून जनतेची कामे रखडली जातात अशी लोकांची सर्वसाधारणपणे प्रतिक्रिया जाणवते. प्रतिसादात्मक प्रशासन ही सध्याच्या काळाची गरज आहे. कारण समाज हा नेहमीच परिवर्तनशील असतो. बदलत्या परिस्थितीची आव्हाने पेलण्यासाठी प्रशासनालाही गतीमान व परिवर्तनशील बनणे क्रमप्राप्त आहे. म्हणून सर्व ग्राम अधिकाऱ्यांनी ठराविक दिवशी प्रत्येक ग्रामपंचायतीत जावून थेट ग्रामस्थांशी चर्चा करून प्रश्न समजावून घेणे व जे प्रश्न सुटण्यासारखे आहेत ते सोडविण्याची प्रक्रिया सुरू करणेसाठी ग्रामस्थ दिन हा अभिनव उपक्रम आयोजित करणेचे निश्चित करणे आले आहे.